# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २०/०५/२०२२ (शुक्रवार)

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक ०४.०७.२० चे २०.५६ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. ४५७/२० कलम ३७६,४५२,३७६(२),(एन), भादवि ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०४.०७.२० चे १६.०० ते १६.३० वा दर यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी मंदीराजवळ असतांना यातील आरोपी नामे दुर्गेश तारांचद शेंडे वय २४ वर्ष रा चाचेर ता मौदा याने पिडीतेला उचलुन तिचे घरी आणुन दरवाजा बंद करून तिचेसोबत जबरी संभोग केला. सदर गुन्हयात आरोपीला दिनांक ०४.०७.२० रोजी अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती वाझे, यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २०.०५.२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री आर पी पांडे, स्पेशल जज पोक्सो कोर्ट, नागपूर यांनी नमुद आरोपीला कलम ३७६ (ए),(बी), मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व २५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ वर्ष शिक्षा तसेच ४५७ भादवि अन्वयें १ वर्ष, सश्रम कारावास तसेच ५०००/—रू दंड, दंड न भरल्यास ३ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. पलसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहायक फौजदार श्री. शंकरराव तराळे, पोलिस हवालदार श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोना प्रकाश वर्मा, पोलीस शिपाई संदीप सहारे यांनी मदत केली आहे.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :– दिनांक ०८.०९.२०१९ चे ०१.३५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. ५७३/१९ कलम ३०२,३८० भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०७.०९.२०१९ चे १०.३० ते १९.३० वा दरम्यान यातील फिर्यादी दिनेश शाहु यांच्याकडे आरोपी रविसींग हा हॉटेल चे कामकाजाकरीता होता.आरोपी हा काम व्यवस्थीत करीत नसल्यामुळे फिर्यादीने आरोपीला कामावरून काढुन माझे पत्नीकडुन हीशोबाचे पैशे घेवुन घे, असे म्हणुन फिर्यादी कामावर निघुन गेला. त्यानंतर आरोपीने पैशाचे लेनदेणाचे कारणावरून फिर्यादीची पत्नी मृतक प्रियंका दिनेश शाहु वय २४ वर्ष व मुलगा अनमोल दिनेश शाहु वय ४ वर्ष या दोघांनाही लोखंडी बत्त्याने डोक्यावर गंभीर मारहाण करून जिवानीशी ठार केले. सदर गुन्हयात आरोपीला दिनांक ०८.०९.१९ रोजी अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती वाझे, यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २०.०५.२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री एज जी अडाके, अतिरीक्त सत्र न्यायाधिश नागपूर यांनी नमुद आरोपीला कलम ३०२ भादवि मध्ये जन्मठेपेची शिक्षा व २०००रू दंड, दंड न भरल्यास ४ महीन्याचा सश्रम कारावास, कलम ३८० भादवि मध्ये ०२ वर्षाचा सश्रम कारावास व १००० रू दंड, दंड न भरल्यास ३० दिवसाचा सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्यामसुंदर पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहायक फौजदार श्री. शंकरराव तराळे, पोलिस हवालदार श्री. सुनिल डोंगरे, पो हवा मनोज तिवारी, पोहवा मधुकर आदमने, पोना प्रकाश वर्मा,यांनी मदत केली आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कन्हान** :– अंतर्गत अन्नामोड ते गोंडेगाव रोड व पोल्ट्रीफोर्म समोर १२ किमी पश्चिम, दिनांक १८/५/२२ चे १९.०० ते १९.१५ वा दरम्यान, यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र नामे –रंजित रामनारायन डेहरिया वय २२ वर्ष रा. सिमरियाता. जि. सिवनी मध्यप्रदेश ह.मु नांदगाव येसंबा हे अन्नामोड येथुन नांदगाव येथे पायदंळ जात असतांना पाठीमागुन येणारे कोळसा ट्रकचे चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी व **फिर्यादीचा मित्र याला मागुन ठोस मारून घटनास्थळावरून पळुन गेला, सदर अपघातामध्ये रंजित रामनारायन डेहरिया वय २२ वर्ष हा जागीच मरण पावला** तसेच फिर्यादी हा जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोहीत केशरी डेहरिया वय २९ वर्ष रा. सिमरियाता. सिवनी जि. सिवनी मध्य प्रदेश ह.मु नांदगाव येसंबा यांचे रिपोर्टवरून पो स्टे कन्हान येथे कलम २७९,३३७, ३०४(अ) भा.द.वि सह कलम १८४,१३४(अ)(ब) मो.वा.का. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा अरून कुमार सहारे मो.नं. ९३०९५९२५२१ करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन मौदा :—** अंतर्गत एन एच —५३  नागपूर ते भंडारा हायवे रोड कढोली शिवार, १९/०५/२२ चे ०५.३० वा दरम्यान, यातील मृतक/आरोपी आयसर ट्रक क्र एम एच—२७ बीएक्स ६५५५ चा चालक असून त्याला झोपेची झपकी लागल्याने त्याचे गाडीवरील नियंत्रण सूटून सदर ट्रक हायवे रोडवर असलेल्या **डिव्हायडर वर चढून पलटी होउन ट्रकमध्ये दबून स्वताचे मरणास कारणीभूत ठरला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोहम्मद मुजम्मिल मोहम्मद शरीफ सौदागर वय २३ वर्ष रा. पथरोट ता. अचलपुर जि. अमरावती यांचे रिपोर्टवरून पो स्टे मौदा येथे कलम २७९,३३७,३०४ (अ),सहकलम १८४ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक/अरविंद मोहोड मो क्र ९८२३९१०१५६ करीत आहेत.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कुही :—** अंतर्गत यातील मृतक नामे— रविंद्र मैपतराव धांडे वय ४३ वर्ष रा. कुही हा दि. १९/०५/२०२२ रोजी सकाळी ११/३० वा. शेतात कामाला गाव तलावाच्या पाळी वरून जात असतांना त्याचा पाय घसरून पाण्यात पडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी चे रिपोर्टवरून पोस्टे कुही येथे कलम १७४ जाफौ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास पोना/५४८ ग्यानीवंत गुरपुडे पोस्टे कुही मो. नं. ९५५२५३१००२ करीत आहेत

## जबरी चोरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** — अंतर्गत मौजा चनकापूर शिवार ०२ के एम दक्षिण (डॉ.गूडधे यांचा फॉर्महाऊस) दिनांक १९.०५.२०२२ चे ००/३०ते ०१/०० वा दरम्यान, यातील फीर्यादी हे आपल्या चनकापूर शिवारातील गुडधे फॉर्महाऊस, येथे घरी झोपले असता, अज्ञात ०४ ईसमाने फॉर्महाऊस चे मागील दार तोडुन, घराच्या आत प्रवेश करून, **फिर्यादीला चाकुचा धाक दाखवून फिर्यादीचे डोळ्यावर पट्टी बांधुन फिर्यादीचे पलंगावरील गादीखाली ठेवलेले नगदी २,०००/— रू व फिर्यादीचे कानातील सोन्याची बाळी वजन ०३ ग्रॅम कि. १०,०००/— व नोकिया कंपणीचा मोबाईल कि १,०००/— रू असा एकूण १३,०००/— रू चा माल जबरीने हिसकावून घेवून गेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्री शंकरराव चैतूजी गुधडे वय ३० वर्षे रा. चनकापूर ता सावनेर यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम ३९४,४५२,५०६ भादवि अंतर्गत गुन्हृयाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मिश्रा मो न ९५११२९०८४९ हे करीत आहेत.

## चोरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** अंतर्गत विक्तूबाबा देवस्थान टाकळघाट. यातील फिर्यादी दिनांक १६/०५/२२ चे १२.३० ते १९/०५/२२ चे १४.०७ वा. दरम्यान, बूध्द पोर्णिमा असल्याने विक्तूबाबा देवस्थान येथे दर्शन करण्यास गेली असता, प्रसाद घेते वेळेस **फिर्यादीचे गळ्यातील सोन्याचा गोफ १२ ग्रॅमचा किमती २०,०००/—रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ. मंजू मोहन बोरकर वय ५० वर्ष रा.रामजी आंबेडकरनगर वाडी नागपूर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे एमआयडिसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पो हवा दयाराम मो.न. ९९६०६०२४७८ हे करीत आहे.

## बॅटरी चोरी

**पोलीस स्टेशन कुही :—** अंतर्गत मौजा सुरगाव २० किमी पश्चिम. यातील फिर्यादी यांना दि. १७/०५/२०२२ रोजी सकाळी ०७/०० वा. माहीती झाले कि, सुरगाव येथील भागोजी किटुकले यांच्या शेतात लावलेल्या टॉवर ला विद्युत पुरवठा करणाऱ्या बॅटरीची चोरी झालेली आहे. फिर्यादीने जावुन पाहीले असता टॉवर जवळ सेल्टर रूम मधील लोखंडी रॅक मध्ये बसविण्यात आलेल्या **एकुण २४ बॅटऱ्या अमर राजा कंपनीचा किं. १२,५००/—रू. च्या कोणीतरी अज्ञात चोरट्याने सेल्टर रूम चा कडी कोंडा तोडुन दि. १७/०५/२०२२ चे रात्री ०३/०० वा. ते ०५/०० वा. दरम्यान चोरी करून घेवुन गेल्याचे दिसले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—आशिष नरसिंगराव खंडागळे वय ३४ वर्ष रा. अंबाझरी ले आउट सुभाष रोड नागपुर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कुही येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा/नामदेव पुजारी पोस्टे कुही मो नं. ७७७५८११६१९ हे करीत आहे.

## रोटाव्हेटर चोरी

**पोलीस स्टेशन कुही :—** अंतर्गत मौजा मांढळ १२ किमी पुर्व. यातील फिर्यादी यांनी मौजा मांढळ येथे घरासमोर रोटोव्हेटरचे ठेवले होते. दिनांक १९/०५/२०२२ रोजी सकाळी १०/०० वा रोटोव्हेटरचे काम असल्याने पाहणी केली असता दिसले नाही. त्यांनतर लगेच सी.सी.टी.व्ही फुटेज चेक केले असता दिनांक १५/०५/२०२२ चे ०१/३० वा. सुमारास २ ईसम एका ट्रॅक्टरला रोटाव्हेटर लावुन घेवुन गेल्याचे दिसत आहे. परंतु त्या ट्रॅक्टरचा नंबर व कोण ईसम आहे, ते समजत नाही. व आजुबाजुला शोध घेतला मिळुन आला नाही, तरी **रोटाव्हेटर किमत अंदाजे १,२५,०००/— रू कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— वसंता प्रभाकर ठाकरे वय ३३ वर्ष रा. मांढळ यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कुही येथे आरोपीविरूध्द कलम ३७९,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला असून, सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोना/रोशन नारनवरे पोस्टे कुही मो. ७८७५१६१४३५ हे करीत आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**